

# ३. सांगीतिक परिभाषा



### ३.१ आलाप :

रागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन विलंबित किंवा मध्यलयीत केलेला स्वरविस्तार म्हणजे 'आलाप' होय.

### ३.२ तान :

रागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन द्रुतलयीत केलेला स्वर विस्तार म्हणजे 'तान' होय.

### ३.३ बोल आलाप :

रागाच्या नियमानुसार बंदिशीमधील बोलांच्या आधारे म्हटलेल्या आलापांना 'बोल आलाप' म्हणतात.

### ३.४ बोलतान :

बंदिशीमधील बोलांच्या आधारे म्हटली जाणारी तान म्हणजे 'बोलतान'. बंदिशीमधील बोलांचा अंतर्भाव त्या तानेमध्ये करणे म्हणजे 'बोलताना' होय.

### ३.५ कणस्वर :

एक स्वर घेताना पुढच्या किंवा मागच्या स्वराला स्पर्श करण्याच्या क्रियेला 'कणस्वर' असे म्हणतात. जसे; राग भूपालीमध्ये धैवत घेताना षड्ज स्वराचा कणस्वर घेतला जातो. ग प ^सां^ध ^सां^ध सां

### ३.६ गमक :

स्वरांचे कंपन करून त्यांना वजन देण्याच्या क्रियेला 'गमक' असे म्हणतात.

### ३.७ झाला :

सतारीमध्ये चिकारी किंवा बाजाच्या तारांवर मिझराबद्वारा आघात करत 'दारारारा, दारारारा' हा प्रकार द्रुतलयीत वाजवण्याच्या या क्रियेला 'झाला' असे म्हणतात.

### ३.८ जाती :

स्वर संख्येच्या आधारावर रागाच्या तीन जाती पडतात. १. ओडव (५ स्वर), २. षाड्व (६ स्वर), ३. संपूर्ण (७ स्वर)

### ३.९ तोडा :

सरोद, सतार या वाद्यांवर वाजवल्या जाणाऱ्या तानांना 'तोडा' असे म्हणतात.

### ३.१० खटका :

चार किंवा चारपेक्षा अधिक स्वरांची गोलाई निर्माण करून द्रुत गतीत गायली जाते, त्यास 'खटका' असे म्हणतात. रेसाऩिसा, सारेऩिसा

### ३.११ मुर्की :

जवळजवळच्या २-३ स्वरांचा शीघ्रतेने आलटून पालटून प्रयोग करणे म्हणजे 'मुर्की'. ^धम^प, ^रेऩि^सा

### ३.१२ अलंकार :

आरोह-अवरोहयुक्त स्वरांच्या क्रमिक रचनेस 'अलंकार' असे म्हणतात. उदा. सारेग, रेगम, गमप, सांनीध, नीधप, धपम

### ३.१३ मींड :

एका स्वराकडून दुसऱ्या स्वराकडे घसरत जाताना मधल्या स्वरांना स्पर्श करून जाणे म्हणजे 'मींड' होय. जसे, सां‿प

### ३.१४ न्यास :

गाताना किंवा वाजवताना रागामध्ये ज्या स्वरांवर थांबतो त्या स्वराला 'न्यास स्वर' म्हणतात.

### ३.१५ रजाखानी गत :

तत प्रकारच्या वाद्यांवर द्रुतलयीमध्ये वाजवल्या जाणाऱ्या गतीला ‘रजाखानी गत’ असे म्हणतात.

### ३.१६ : मसीतखानी गत :

तत प्रकारच्या वाद्यांवर विलंबित लयीमध्ये वाजवल्या जाणाऱ्या गतीला ‘मसीतखानी गत’ असे म्हणतात.

### ३.१७ मूर्च्छना :

गायन वादनात स्वरांची कोमल तीव्र रूपे सांभाळून क्रमवार स्वरसप्तक बनवणे म्हणजे ‘मूर्च्छना’ होय.

### ३.१८ जमजमा :

तंतूवाद्यावर मिझराबच्या (नखीच्या) एका आघातामध्ये एकाच वेळी दोन स्वर वाजवणे याला ‘जमजमा’ म्हणतात.

### ३.१९ बेहलावा :

आलापामध्ये घेतलेली मध्यलयीतील छोटी तान म्हणजे ‘बेहलावा’.

### ३.२० पकड :

रागवाचक स्वरसमूहाला ‘पकड’ असे म्हणतात.

### ३.२१ घसीट

नखीने तार छेडल्यावर पडद्यावर ज्या स्वरावर बोट ठेवले असेल तेथूनच तार ओढून घसरत मिंड घेऊन स्वरांपर्यंत नेण्याच्या क्रियेला ‘घसीट’ म्हणतात.

### ३.२२ सूत

खालच्या स्वरावरून वरच्या स्वरावर किंवा वरच्या स्वरावरून खालच्या स्वरावर अनुनासिक उच्चारात मींड पद्धतीने स्वर म्हणणे ह्या क्रियेला ‘सूत’ म्हणतात.

### ३.२३ थाट

राग निर्मितीची क्षमता असलेल्या सप्त स्वरांच्या समूहाला ‘थाट’ असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र. १ रिकाम्या जागा भरा.**

(१) गाताना किंवा वाजवताना ज्या स्वरावर आपण थांबतो त्याला .......... म्हणतात.

(२) आलापामध्ये घेतलेली छोटीशी तान म्हणजे .......... होय.

**प्र. २ खालील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या लिहा.**

(१) कणस्वर

(२) खटका

(३) गमक

(४) मींड

(५) थाट

(६) जमजमा

**प्र. ३ खालील पारिभाषिक शब्दांमधील फरक १/१ वाक्यात लिहा.**

(१) आलाप–ताना

(२) मसीतखानी गत– रजाखानी गत

(३) तान– बोलतान

(४) मुर्की– बेहेलावा